wetland - WC-73 Report.

Email: dsaltcom.mum@nic.in
Phone: 022-20825206, 20822192

सत्यमेव जयते

**भारत सरकार**

GOVERNMENT OF INDIA

**उपनमक आयुक्त कार्यालय**

Office of the Deputy Salt Commissioner

**एक्स्चेंज बिल्डींग, चौथी मंजील, सर शिवसागर रामगुलाम मार्ग, बेलार्ड ईस्टेट, मुंबई - 400001.**

Exchange Building, 4th floor, Sir Shivsagar Ramgulam Marg,
Ballard Estate, MUMBAI – 400001

C. No. D-11030/1/Land/2008/II/ 5728 Date: 14/10/2022

To

The Deputy Forest Conservator,
Mangrove Cell, 302, Wakefield House,
3rd Floor, Ballard Estate, Mumbai – 400001.

Sub:- Destruction of wetlands and mangroves near Bhakti Park mono rail station and nearby areas in Wadala – Complaint by shri Stalin D - Reg.

Madam,

Please refer to your letter dated 30.09.2022 addressed to this office on the above subject.

In this regard it is informed that following salt pan lands in Wadala Salt Pan Division are belonging to Government of India:-

1) **Hormoz salt works under CS No. 144 & 145** : In the possession of salt manufacturers for the purpose of salt manufacture and eviction proceedings under PP Act 1971 are pending against them.
2) **Dadkhudai salt works under CS No. 210** : In the possession of salt manufacturers and Estate Office of this Office has passed eviction order against which they have filed WP No. 3069/2016. The Hon'ble Bombay HC vide their order dated 15.12.2016 has granted status quo in the matter.
3) **Hormoz salt works under CS No. 83** : The land was in the possession of salt manufacturers. But, reportedly the District Collector, Mumbai City has taken the possession of the land and has been handed over to the MMRDA.

As per minutes of meeting of District Level Sub-Committee of Mumbai City dated 03.08.2022 (Copy enclosed), the action form removal of debris has to be taken by the Municipal Corporation of

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 389
दिनांक 17/10/2022
Mangrove committee

Greater Mumbai. We have been frequently writing to the MCGM, but no action has been taken by them in this regard.

It is very difficult for us to prevent the dumping of debris and also to prevent any other illegal activities as the lands are in the possession of salt manufacturers. The culprits are mostly land mafias and they are doing such activities during night hours. Two FIRs i.e. No. 265/2020 and No. 358/2021 have already been filed by the Deputy Superintendent of Salt, Wadala at Wadala Police Station and further action from the Police is awaited in these FIRs. It is suggested that the Mangrove Cell may also file FIRs against the culprits in Police Station. However, we are taking all necessary steps to take action against such illegal activities. During June 2022, a demolition drive was conducted at Wadala with the help of MCGM and Forest Department (Mangrove Cell).

Encl. : As above.

Yours faithfully

Y Yadav
14.10.2022
(Y. K. Yadav)
for Deputy Salt Commissioner
Mumbai

Copy for information and necessary action to :
1) The Superintendent of Salt, Bhandup.
2) The Deputy Superintendent of Salt, Wadala.

109

**Email**

**Deputy Salt Commissioner**

**कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करणेकामी जिल्हास्तरीय उपसमितीची बारावी दि. 03/08/2022 रोजीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.**

**From :** cts rev mumbaicity <cts.rev.mumbaicity@gmail.com> Fri, Sep 02, 2022 05:32 PM

**Subject :** कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करणेकामी जिल्हास्तरीय उपसमितीची बारावी दि. 03/08/2022 रोजीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

1 attachment

**To :** rbkonkan@gmail.com, ccfmmumbai@gmail.com, Mangrove Mangrove Cell <ccfmangrove@mahaforest.gov.in>, dfommcu@mahaforest.gov.in, dfommcu@gmail.com, DCP Operation <cp.mum.dcpops@mahapolice.gov.in>, ee01 swm <ee01.swm@mcgm.gov.in>, dmc swm <dmc.swm@mcgm.gov.in>, ddtpmumbai@gmail.com, romumbai@mpcb.gov.in, Deputy Salt Commissioner <dsaltcom.mum@nic.in>, Bharat Dinkar Kalskar <rto.01-mh@gov.in>, prasad1@cat.org.in, debi@cat.org.in, stalin vanashakti <stalin.vanashakti@gmail.com>, sudheerjadhv@aol.com, sbj400074@gmail.com

उप नमक आयुक्त कार्यालय, मुंबई
Office Of The Deputy Salt Commissioner
Mumbai
LAB
05 SEP
सं./No. 4046

Respected Sir/Madam,

कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करणेकामी जिल्हास्तरीय उपसमितीची दि. 03/08/2022 रोजीच्या बारावी बैठकीचे मंजूर इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत आहे.

Please See This Attachment.

**Agenda Dated 03.08.2022.pdf**
4 MB

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001
Fax 22661239, Tel. 22665233, Email : cts.rev.mumbaicity@gmail.com
(भूमापन व भूमि अभिलेख शाखा)

क्रमांक:- सीएसएलआर/एसॲण्डएलआर-१/टे-१/का.व पा./
जि.स.उपसमिती बारावी बैठक/ इतिवृत्त/ २०२२ /
दिनांक : 02 /08/२०२२ / डी.फ.-3079

प्रति,

मा.विभागीय आयुक्त,
कोकण विभाग, कोकण भवन,
सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई-४०० ६१४.

**विषय :- कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करणेकामी जिल्हास्तरीय उपसमितीची बारावी दि. 03/08/2022 रोजीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.**

संदर्भ :- १. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र. मशा/कार्या-९/वने/जनहीत याचिका क्र.८७/२००६/२०१८ दि.०३/११/२०१८.
२. या कार्यालयाचे दि. २०/०७/२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत कांदळवनाचे प्रभावीपणे संरक्षण व संवर्धन करणेबाबत जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय उपसमिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हास्तरीय उपसमितीची बारावी बैठक जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे अध्यक्षतेखाली दि. ०३/०८/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात आली असून, त्याबाबतचे इतिवृत्त यासोबत सादर करणेत येत आहे.

(राजीव निवतकर)
**जिल्हाधिकारी, मुंबई शहर**
**तथा,**
**अध्यक्ष, जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन उपसमिती**

**प्रत :- (इतिवृत्ताच्या प्रतीसह)**

१. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, विभागीय वन रूम नं.बी/६८, पहिला मजला, कामगार नगर, कुर्ला (पू) मुंबई ४०००२४.
२. अधीक्षक, नगर भूमापन व भूमि अभिलेख (शहर), जूने जकात घर, १ ला मजला, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
३. पोलीस उप आयुक्त, (अभियान) पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय, डी.एन.रोड,फोर्ट,मुंबई ४०० ००१.
४. उपआयुक्त मिठागरे, (Deputy Salt Commissioner),एक्सचेंज बिल्डिंग, ४ था मजला,सर शिवसागर राम गुलाम मार्ग, बेलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.
५. श्री. प्रसाद खाले/डेबी गोयंका, ५, सहकार भवन, पहिला मजला, एल.बी.एस.रोड, नारायन नगर, घाटकोपर, मुंबई-४०००८६
६. श्री. स्टॅलिन डी, संचालक वनशक्ती, नंदकुमार पवार हाऊस, २ रा मजला, जगन्नाथ दर्शनसमोर, एम.डी.केनी मार्ग, भांडुप गांव (पू.), मुंबई -४२.

# इतिवृत्त

मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०३/०८/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता कांदळवन/पाणथळ संरक्षण व संवर्धन सनियंत्रण जिल्हास्तरीय उपसमिती (मुंबई शहर) बाराव्या बैठकीचे मंजुर इतिवृत्त.

सदर बैठकीमधील उपस्थिती खालीलप्रमाणे.

| अनु.क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नाव व कार्यालय | हुद्दा |
|---|---|---|
| १. | श्री. राजीव निवतकर, जिल्हाधिकारी, मुंबई शहर | अध्यक्ष |
| २. | श्री. मगदुम, सहायक वन संरक्षक, कांदळवन संरक्षण घटक | सदस्य सचिव |
| ३. | श्री.कृष्णात कणसे, अधीक्षक, मुंबई नगर भूमापन व भूमि अभिलेख (शहर) | सदस्य |
| ४. | पोलीस उप आयुक्त (अभियान) पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | श्री. पी. के. शर्मा उप नमक अधिक्षक, वडाळा, मिठागरे, मुंबई | सदस्य |
| ६. | श्रीमती स्वाती कदम, उप नमक अधिक्षक, वडाळा यांचे प्रतिनिधी | |
| ७. | श्री. देबी गोयंका, बॉम्बे एनव्हायरमेंट एक्शन ग्रुप. | |
| ८. | श्री. स्टॅलिन डी. संचालक वनशक्ती. | |

प्रथम मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर, यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली. जिल्हास्तरीय समितीच्या बाराव्या बैठकीमध्ये झालेली चर्चा खालील प्रमाणे आहे.

जिल्हा :- मुंबई शहर

| अ. क्र. | तक्रारदारांचे नांव व तक्रारीचा विषय, पत्रांचा क्रमांक व दिनांक | केलेल्या कार्यवाहीचा तपशिल | प्रकरणाची सद्यस्थिती | बैठकीमध्ये झालेली चर्चा | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|
| १. | Complaint of Shri. Debi Goenka and Shri. Prasad khale, Conservation Action Trust, Bombay dt. २९/०४/२०१४, dt.१७/१२/२०१८, dt. १६/०४/२०१९, dt. २०/११/२०१९. Destruction of mangroves at near the Sagarmatha Club building Colaba. | इकडील पत्र दि. २३/०४/२०१९ जा.क्र.२८५ अन्वये अहवाल सादर तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून दि.०५/१२/२०१९ रोजी कुलाबा येथील सागरमाथा आर्मी क्लब येथील कांदळवनाचे ऱ्हासाबाबत श्री. प्रसाद खाले यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संयुक्त स्थळपाहणी करणेकरीता मा. जिल्हाधिकरी, मुंबई शहर यांचे प्रतिनिधी, कांदळवन कक्ष विभागकडील अधिकारी व प्रतिनिधी , कफ परेड पोलिस स्टेशनचे प्रतिनिधी व तक्रार अर्जदार श्री. प्रसाद खाले यांचे समवेत दि. ०५/१२/२०१९ रोजी स्थळपाहणी केली असून, सागरमाथा आर्मी क्लब येथे कांदळवनालगत/ कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत संबंधितांनी बांधकाम व भराव टाकून बगीचा तयार करण्यात आल्याचे दिसून आले. | कांदळवन कक्ष वन विभाग यांनी F I R दाखल केलेला असून पुढील कार्यवाही सुरु असल्याचे सांगणेत आले. **तथापि अद्यापही सदरचा अहवाल प्राप्त झालेला नाही.** | दि.३०/९/२०२०, दि. ०९/१०/२०२०, दि.९/१२/२०२०, दि. १२/१/२०२१, दि.०५/०२/२०२१ दिनांक ०५/०३/२०२१ व दिनांक १६/०४/२०२१ रोजीच्या व आजच्या बैठकीमध्ये वनविभागाकडील सहा.वनसंरक्षक हे उपस्थित होते. सदर प्रकरणी केलेलया कार्यवाही बाबतविचारणा केली असता त्यांनी भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम २६ (१) अन्वये वन विभागाने संबंधितांविरुध्द दिनांक २३/१२/२०१९ रोजी विषयात नमुद ठिकाणी झालेल्या कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत गुन्हा (FIR) दाखल केलेला आहे असे कळविले आहे. त्यानुसार दाखल झालेल्या (FIR) बाबत पुढील कायदेशिर कारवाई बाबत विचारणा केली असता वन विभाग यांनी दि. ०६/०१/२०२१ अन्वये HQ MG & G Area (Station Cell) या कार्यालयाकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करुन ऱ्हास झालेल्या कांदळवनावरील अतिक्रमणे तात्काळ काढून घेणेत यावे अथवा आपल्या विरुद्ध आवश्यक ती कार्यवाही या कार्यालयाकडून प्रस्तावित करण्यात येईल असे पत्राने कळविले आहे. तसेच सदर प्रकरणी संबंधितावर न्यायालयात दावा दाखल करणेबाबत वरीष्टांकडे परवानगी घेण्याची कार्यवाही चालु आहे असे कळविले. तसेच तक्रारदार श्री. डेबी गोएंका यांनी सदर प्रकरणी होत असलेली दिरंगाई बाबत नाराजी प्रदर्शित केली असता, मा. अध्यक्ष यांनी सदर प्रकरणी वन विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत लेखी अहवाल समितीसमोर पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत सांगितले.<br>सदरच्या विषयाबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी शर्मा साहेब, अतिरिक्त बृहन्मुंबई महानगर पालिका | कांदळवन संधारण घटक मध्य मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | आयुक्त, यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सदर मुद्दयांबाबत चर्चा करण्यात येईल, असे ठरले. तसेच, वन विभाग हे सदरच्या तक्रारीबाबत कार्यवाही करत नसेल, तर महसूल विभागातर्फे कार्यवाही करण्यात येईल,असे मा. जिल्हाधिकारी यांनी उपस्थितांना सूचना दिल्या. सागरमाथा क्लबचे कार्यवाहक कोण आहेत ? याबाबत खात्री करण्यात यावी, असे वन विभागाच्या उपस्थितांना निर्देश दिले. तसेच, वन विभागाच्या श्री रेड्डी यांना अर्धशासकीय पत्र पाठविण्यात येईल, असे सूचना अध्यक्ष यांनी दिल्या. | |
| २. | श्री. स्टॅलिन डी व लुक मेंडीस Mangroves under threat at Bandra East below Mahim-sion link way. मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील पत्र क्र. सी/कार्या-२/आय/टे-८/कावि.—को.स.कां.त./१८ दि. १४/०१/२०१९ रोजीचे पत्र. (E-mail व्दारे प्राप्त दि. २७/०२/२०१९)<br>सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडील जा.क्र. कक्ष-१/ल.ले/१६५/सन २०१८-१९ दि. १०/१२/२०१८ रोजीचे पत्र | इकडील पत्र दि.२२/०४/२०१९ जा.क्र.६३२ ने अहवाल सादर.<br>तक्रारीच्या अनुषंगाने दि.२०/०३/२०१९ रोजी या कार्यालयातील श्री.बी. व्ही तोरस्कर, परिरक्षण भूमापक, कांदळवन संधारण घटक मध्य मुंबई यांचेकडील श्री. र. र. मन्सूरी (वनपाल दादर / कुलाबा) व डी. एल. झुगरे (वनरक्षक दादर) सदर जागा ही माहिम धारावी पुल (Bridge) लगत असून, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात डॅब्रीज टाकलेले आढळून आले. डॅब्रीज कोणी टाकले याबाबत स्थानिक रहीवाश्यांकडे चौकशी केली असता, डॅब्रीज हे रात्री उशिरा टाकण्यात येते. असे सांगण्यात आले. सद्यस्थितीत कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही. परंतु सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात डॅब्रीज टाकले असल्याने ते पुढे पुढे सरकत तिवरांची झाडे जिथे आहेत. तिथपर्यंत पसरलेले आहे. भविष्यात डॅब्रीजचे प्रमाण वाढल्यास डॅब्रीज मुळे झाडांना मिळणाऱ्या पाण्याचा पुरवठा खंडीत होऊन, झाडे नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी प्रथम त्याठिकाणचे डॅब्रीज हटविणे नितांत गरजेचे आहे. जेणे करुन झाडांना होणारा पाणी पुरवठा सुरळीत राहील. | इकडील पत्र दि.१३/११/२०२० (जा.क्र. १५४७), पत्र दि. १२/०८/२०२१ (जा.क्र. १८८७), व पत्र दि. ०३/०९/२०२१ (जा.क्र.२०५०) घन कचरा व व्यवस्थापन विभाग बृ.मुं.म.पा. तसेच दि. १२/०२/२०२१ जा.क्र.३०७ अन्वये मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, यांना तसेच अनधिकृत डेब्रीज भरणी प्रकरणी गांभीर्याने दखल घेऊन मा. उच्च न्यायालयामधील जनहीत याचिका क्र. ८७/२००६ मधील दि. १७/०९/२०१९ रोजीचे आदेशानुसार त्वरीत सदर जागेवरील डेब्रीज काढणेबाबतची कार्यवाही करणेबाबत संबंधितांना आपले स्तरावरुन आवश्यक तो निधी व परवानगी देण्याचे निदेश देण्यात यावे असे आदेशित केले आहे. **तथापि अद्यापही सदरचा अहवाल प्राप्त झालेला नाही.** | मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र. ८७ of २००६ आदेश दि. १७/०९/२०१८ अन्वये सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका यांना जागेवरील डेम्ब्रीज काढणेबाबत तात्काळ मंजूरी घेऊन कार्यवाही त्वरीत करणेबाबतचे सुचना दिलेल्या आहेत.<br>तसेच दिनांक ०५/०३/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये मा.अध्यक्ष यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांनी तक्रारदार यांचे सोबत दि. ०६/०३/२०२१ रोजी तक्रारीचे जागेवर जाऊन संयुक्त स्थळपहाणी करुन अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.<br>सदर जागेची इकडील कार्यालयाकडून मोजणी करुन सर्व्हे क्रमांक देण्याबाबतची कार्यवाही ३ महिन्याच्या मुदतीत कार्यवाही करावी, अशा सूचना दिल्या. | १. बृहन्मुंबई महानगरपालिका (घन कचरा व व्यवस्थापन विभाग)<br>२. पोलिस उपआयुक्त (अभियान)पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | इकडील अभिलेख पहाता, सदर जागा हि माहिम विभागातील असून, सदर जागा खाडीची आहे. त्याला भूकर क्रमांक देण्यात आलेला नाही. | | | |
| | | केलेल्या कार्यवाहीचा तपशील | प्रकरणाची यथास्थिती | बैठकी मध्ये झालेली चर्चा | |
| ३. | श्री. स्टॅलीन डी, Distraction of wetlands in Mumbai suburban. The site in question lies near wadala सदस्य सचिव कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती मुंबई यांचे कडील दि.२५/०२/२०१९ रोजीचे Email व्दारे प्राप्त झालेले तक्रारदार श्री. स्टॅलीन डी. यांचा तक्रार अर्ज. | इकडील पत्र दि. २३/०४/२०१९ जा.क्र. ६७० ने अहवाल सादर तक्रारीच्या अनुषंगाने दि. २०/०३/२०१९ रोजी या कार्यालयात श्री. आर.व्ही. शिर्के, परिरक्षण भूमापक, कांदळवन संधारण घटक मध्य मुंबई यांचेकडील डी.एल.झुगरे (वनरक्षक, दादर).सदर जागा बी पी टी टोल नाक्या जवळ फ्री वेच्या खालील रोड ते चेंबूर वडाळा रोडच्या कडेला तसचे भक्तीपार्क मोनोरेल स्टेशन खालून जाणाऱ्या रोडच्या दोन्ही बाजूस ठिक ठिकाणी दगड,माती, रॅबीटचे ढिग आढळून आले सदर ढीग रस्त्याच्या कडेला असून त्याला लागून कांदळवन आहे. सदर कांदळवनापासून रस्ता ५० मीटरच्या आत आहे. तथापि, चेंबूर वडाळा रोड व त्यावरून जाणार फ्री वे हे मुख्य रस्ते आहेत.<br>सदर दगड,माती व रॅबीट चे ढिग रस्त्याच्या कडेला असून कांदळवनाच्या जवळच आहेत. सदर जागेवर डेम्ब्रीजचा भरण सॉल्टपॅन विभागातील भूकर क्र. २१० या मिळकतीवर झाल्याचे निदर्शनास आले आहे. वन विभागाकडील पत्र दि. १८/०३/२०१९ नुसार सदर भराव अधिसूचीत कांदळवन क्षेत्रापासून ५ ते १० मीटर अंतरावर असल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने सॉल्टपॅन विभाग यांनी दिनांक ०५/११/२०२० रोजी वडाळा पोलीस स्टेशन | इकडील पत्र दि.१३/११/२०२० जा.क्र. १५२१, दि.०७/१२/२०२० जा.क्र.१६५९ व दि. ३१/१२/२०२० जा.क्र. १८५४, पत्र दि. १२/०८/२०२१ (जा.क्र. १८८७), व पत्र दि. ०३/०९/२०२१ (जा.क्र.२०५०) अन्वये सह आयुक्त (घन कचरा व्यवस्थापन) बृहन्मुंबई महानगर पालिका व दि. १२/०२/२०२१ जा.क्र. ३०७ अन्वये मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, यांना अनधिकृत डेब्रीज भरणी प्रकरणी गांभीर्याने दखल घेऊन मा. उच्च न्यायालयामधील जनहीत याचिका क्र. ८७/२००६ मधील दि. १७/०९/२०१९ रोजीचे आदेशानुसार त्वरीत सदर जागेवरील डेब्रीज काढणेबाबतची कार्यवाही करणेबाबत संबंधितांना आपले स्तरावरुन आवश्यक तो निधी व परवानगी देण्याचे निदेश देण्यात यावे असे कळविले आहे. **तथापि अद्यापही सदरचा अहवाल प्राप्त झालेला नाही.** | बैठकीच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र. ८७ of २००६ आदेश दि.१७/०९/२०१८अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका यांना जागेवरील डेब्रीज काढणेबाबतची त्वरीत कार्यवाही करणेबाबतचे सुचना, पत्र व्यवहार करुन देखिल कार्यवाही झाली नसल्याने नाराजी व्यक्त केली बृहन्मुंबई महानगरपालिका अद्यापही सदर जागेवरील अनधिकृत डेब्रीज काढणेबाबतची कार्यवाही केलेली दिसुन येत नाही. या बाबत मा.अध्यक्ष यांनी मा.अतिरीक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेशी सदर प्रकरणी चर्चा करावी तसेच डेब्रीज काढणे बाबत त्वरीत कार्यवाही करुन मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र. ८७ of २००६ आदेश दि. १७/०९/२०१८ अन्वये अवमान होणार नाही याची दक्षता घेवुन सदर प्रकरणी **Contempt Petition** झाल्यास आपण सर्वस्वी जबाबदार असाल याची नोंद घ्यावी. जागेवरील डेब्रीज काढणेबाबत तात्काळ मंजूरी घेऊन त्वरीत कार्यवाही करणेबाबतचे सुचना दिलेल्या आहेत. महापालिका यांचे उपस्थित प्रतिनिधी यांनी सदर ठिकाणेचे डेब्रिज काढले असे कळविले असता तक्रारदार यांनी कोणतेही डेब्रिज काढण्यात आले नाही असे सांगितले. या बाबत लेखी अहवाल व फोटोस पुढील बैठकी पुर्वी सादर करण्यात यावे असे सुचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. पोलीस उपआयुक्त, (अभियान), (का.व.सु) मुंबई, यांचे उपस्थित | १. बृहन्मुंबई महानगरपालिका (घन कचरा व व्यवस्थापन विभाग)<br>२. पोलिस उपआयुक्त (अभियान)पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई<br>३. नमक उपायुक्त, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ...करणाऱ्या अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा नोंद केला आहे. | | प्रतिनिधी यांना प्रकरणी अज्ञात व्यक्ती विरुध्द दाखल केलेल्या गुन्हा बाबत लेखी माहिती सादर करणेबाबत कळविले आहे.<br>या बाबत तक्रारदार श्री. स्टॅलीन डी यांनी सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका यांना जागेवरील डेब्रीज काढणेबाबतची कार्यवाही न केलेबाबत नाराजी व्यक्त केली असुन पुढील बैठकीपुर्वी डेब्रीज काढणे बाबतची अपेक्षा व्यक्त केली आहे.<br>सदरच्या जागेवरील डेब्रिज उचलत नाही याबाबत सहाय्यक सरकारी अभियोक्ता व विभागीय आयुक्त यांना पत्राने कळविणेबाबत सूचना दिल्या. | |
| ४. | स्टॅलीन डी. वनशक्ती पाणथळ क्षेत्रावर अनधिकृत भरणी होत असलेबाबत.<br>१. वनपरिक्षेत्र अधिकारी कांदळवन संधारण घटक मध्य मुंबई यांचेकडील पत्र क्र. जा.क्र. /व.कां.म.मु./गुन्हे /२२६/सन२०२०-२१ दि. २१/१०/२०२०. रोजीचे पत्र.<br>२. स्टॅलीन डी. वनशक्ती यांचा दि. ०२/११/२०२० रोजीचा ई-मेल व्दारे प्राप्त तक्रार अर्ज. | कांदळवन / पाणथळ तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारीच्या जागेवर दि. १०/११/२०२० जाऊन संयुक्त स्थळपहाणी केली असता, सदर जागा ही सॉल्ट पॅन विभागातील भूकर क्रमांक २१० तसेच २/१४५ वर येत असून, त्यापैकी भूकर क्रमांक २१० या मिळकतीमध्ये दोन ठिकाणी २०.०० X ३४.०० = ६८०.०० चौ.मी. व २१.०० X ४५.०० =९४५.०० चौ.मी. क्षेत्रावर दगड, माती, रॅबीट, चे ढीग आढळून आले. सदरचे ढीग पाणथळ क्षेत्राच्या लगत आहेत. एका बाजूला कांदळवन असून, त्यालगत पाणथळ (पूर्वीची मिठागरे) व त्यालगत गवत, कच्चा रस्ता व झोपडपट्टी आहे. तसेच भूकर क्रमांक २/१४५ या जागेत २०.०० X ३०.०० = ६००.०० चौ.मी. क्षेत्रावर दगड, माती, रॅबीट चे ढीग आढळून आले. सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही. | इकडील पत्र दि.०७/१२/२०२० (जा.क्र. १६५९) व दिनांक ३१/१२/२०२० जा.क्र. १८५४, पत्र दि. १२/०८/२०२१ (जा.क्र. १८८७), व पत्र दि. ०३/०९/२०२१ (जा.क्र.२०५०) अन्वये डेम्ब्रीज काढणेबाबत बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या घन कचरा व दिनांक १२/०२/२०२१ जा.क्र.३०७ अन्वये मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, यांना अनधिकृत डेब्रीज भरणी प्रकरणी गांभीर्याने दखल घेऊन मा. उच्च न्यायालयामधील जनहीत याचिका क्र. ८७/२००६ मधील दि. १७/०९/२०१९ रोजीचे आदेशानुसार त्वरीत सदर जागेवरील डेब्रीज काढणेबाबतची कार्यवाही करणेबाबत संबंधितांना आपले स्तरावरुन आवश्यक तो निधी व परवानगी देण्याचे निदेश देण्यात यावे असे कळविले आहे. **तथापि अद्यापही सदरचा अहवाल प्राप्त झालेला नाही.** | मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र. ८७ of २००६ आदेश दि. १७/०९/२०१८ अन्वये सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका यांना जागेवरील डेम्ब्रीज काढणेबाबतची कार्यवाही त्वरीत करणेबाबतचे सुचना दिलेल्या आहेत. याबाबत बृहन्मुंबई महानगर पालिका मुंबई यांनी सत्वर कार्यवाही करावी.<br>भूकर क्रमांक २/१४५ चे सर्वेक्षण करुन मिळकत पत्रिका उघडणेबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी सूचना दिल्या. व मीठ विभागाच्या प्रतिनिधीस डेब्रीज उचलणेबाबत सूचना दिल्या. | १. बृहन्मुंबई महानगरपालिका (घन कचरा व व्यवस्थापन विभाग)<br>२. पोलिस उपआयुक्त (अभियान)पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई<br>३. नमक उपायुक्त, मुंबई |
| ५. | श्री. सुधीर बंडु जाधव, संपादक / समाजसेवक यांचेकडील पत्र दि.०२/११/२०२० रोजीचे पत्र. शांतीनगर, बीपीटी रोड लगत, | कांदळवन / पाणथळ तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारीच्या जागेवर दि. १८/११/२०२० जाऊन संयुक्त स्थळपहाणी केली असून, सदर अहवालानुसार सॉल्ट पॅन विभागातील भूकर क्रमांक २/१४५या | जागेवरील डेम्ब्रीज काढणेबाबत इकडील पत्र दि.३१/१२/२०२० (जा.क्र. १८५४), व पत्र दि. १२/०८/२०२१ (जा.क्र. १८८७), व पत्र दि. ०३/०९/२०२१ (जा.क्र.२०५०) अन्वये | मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र. ८७ of २००६ आदेश दि. १७/०९/२०१८ अन्वये सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका यांना जागेवरील डेम्ब्रीज काढणेबाबतची कार्यवाही त्वरीत करणेबाबतचे | १. बृहन्मुंबई महानगरपालिका घनकचरा व व्यवस्थापन विभाग) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ...१००० टन भरणी करुन कांदळवणाचा ऱ्हास करीत असलेबाबत व समुद्राच्या भरती क्षेत्राला भरणी करुन बुजवत असलेबाबत तक्रार अर्ज. | ... = ६००.०० चौ.मी. क्षेत्रावर दगड, माती, रॅबीट चे ढीग आढळून आले. व भूकर क्रमांक ११७ या मिळकतीवरील झोपडपट्टी मधील मदिना मस्जिद जवळ खाडीकडील बाजुस ३३.०० X ७.०० = २३१.०० चौ.मी. क्षेत्रावर १० रुमची चाळीचे नविनच पक्के बांधकाम केलेले (भिंती सिमेंट विटा छप्पर लोखंडी अँगल / पाईप व सिमेंट पत्रा) असल्याचे दिसुन आले. सदर चाळीस पुढील बाजुस १२ फुट उंची व मागील बाजुस ११ फुट उंची आहे. सदरचे अनाधिकृत बांधकाम पाणथळ शेजारी आहे. .सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही. | डेम्ब्रीज काढणेबाबत बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या घनकचरा व व्यवस्थापन विभाग व दिनांक १२/०२/२०२१ जा.क्र.३०७ अन्वये मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, यांना अनधिकृत डेब्रीज भरणी प्रकरणी गांभीर्याने दखल घेऊन मा. उच्च न्यायालयामधील जनहीत याचिका क्र. ८७/२००६ मधील दि. १७/०९/२०१९ रोजीचे आदेशानुसार त्वरीत सदर जागेवरील डेब्रीज काढणेबाबतची कार्यवाही करणेबाबत संबंधितांना आपले स्तरावरुन आवश्यक तो निधी व परवानगी देण्याचे निदेश देण्यात यावे असे कळविले आहे होते. अद्यापही अहवाल प्राप्त आहे.<br>तसेच सदर मिळकतीचे क्षेत्रावर अनधिकृत १० रुम च्या चाळीचे नविन पक्के बाधंकाम केलेल असल्याचे दिसुन आले. त्याबाबत वनविभाग यांना Email व इकडील पत्र दिनाक १५/०१/२०२१ अन्वये कळविण्यात आले होते.सदर प्रकरणी वनविभाग यांचे कडील अहवाल प्राप्त झालेला नाही. मा.अध्यक्ष यांनी दिनाक १६/०४/२०२१ रोजी दिलेल्या सुचने नुसार सॉल्टपॅन विभागातील भूकर क्रमांक ११७ व १४४ या मिळकतीची मोजणी दिनांक १०/०६/२०२१ रोजी करण्यात आलेली आहे. परिरक्षण भूमापक यांचे कडील अहवाल प्राप्त झालेला नाही. | सुचना दिलेल्या आहेत. याबाबत बृहन्मुंबई महानगर पालिका मुंबई यांनी सत्वर कार्यवाही करावी.<br>सॉल्ट पॅन विभागातील भूकर क्रमांक ११७ या मिळकतीचे क्षेत्रावर अनधिकृत १० रुम च्या चाळीचे नविन पक्के बाधंकाम केलेल असल्याचे दिसुन आले. सदर क्षेत्राचा ताबा वनविभाग यांना देण्यात आलेला असल्याने निष्कासित करणेची कार्यवाही करणेबाबत वनविभाग यांना Email व इकडील पत्र दि. १५/०१/२०२१ अन्वये कळविण्यात आले आहे. याबाबत सहा. वन संरक्षक, कांदळवन संरक्षण घटक, मुंबई यांना याबाबत विचारणा केली असता, त्यांनी स्थळपाहणी करुन योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल सादर करणेत येईल असे सांगितले. मा.अध्यक्ष यांनी या बाबतचा लेखी अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे. | २. पोलिस उपआयुक्त (अभियान)पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई<br>३. नमक उपायुक्त, मुंबई |
| ६. | श्री. स्टॅलीन डी. यांचा ई-मेल संदेशान्वये प्राप्त दिनांक १२/०१/२०२१२ रोजीचा तक्रार अर्ज. | कांदळवन / पाणथळ तक्रारीच्या अनुषंगाने दि. १३/०५/२०२१ रोजी या कार्यालयात श्री.आर.व्ही. शिर्के, परिरक्षण भूमापक, तक्रारदार श्री. स्टॅलीन व वनविभागाचे | पत्र दि. १२/०८/२०२१ (जा.क्र. १८८७), व पत्र दि. ०३/०९/२०२१ (जा.क्र.२०५०) मा. उच्च न्यायालयमधील जनहीत याचिका क्र. | मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र. ८७ of २००६ आदेश दि. १७/०९/२०१८ अन्वये सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका यांना जागेवरील डेब्रिज | १. बृहन्मुंबई महानगरपालिका (घन कचरा व व्यवस्थापन विभाग) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कडील दिनांक ०७/०४/२०२१ रोजीचे पत्रान्वये सदर तक्रारीचे क्षेत्र मुंबई शहर जिल्हयामध्ये येत असले बाबत.<br>Reclamation and Illegal Construstion At Azad Mohalla. | [illegible] सोबत तक्रारीच्या जागेवर जाऊन संयुक्त स्थळपहाणी केली असून, सदर अहवा[illegible]नुसार सॉल्ट पॅन विभागातील भूकर क्रमांक ११७ व १४४ लगत दगड, माती, रॅबीट चे ढीग आढळून आले. सदरचे ढीग पाणथळ क्षेत्रालगत आहेत. भूकर क्रमांक १४४ च्या हद्दीवर एक दगडी जुना गोल बुरुज असुन लगत पाणथळाची जागा व मॅग्रोजची अंदाजे दोन ते तीन झाडे आढळुन आली. तसेच भूकर क्रमांक ११७ वर अंदाजे २५ ते ३० पक्कया झोपडया असुन सदर झोपडया बंद असल्याचे आढळुन आले.सदर झोपडया भराव करुन कांदळवनापासुन अंदाजे ५० मीटरचे आत असल्याचे दिसुन येते. तसेच मा. आमदार कॅप्टन सेल्वन यांनी समाज कल्याण केंद्र, व्यायाम शाळा व वाचनालयाचे अर्धविट बांधकाम आढळुन आले. सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही. | ८७/२००६ मधील दि. १७/०९/२०[illegible] रोजीचे आदेशानुसार त्वरीत स[illegible] जागेवरील अनधिकृत डेब्रि[illegible] काढणेबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई यांनी करावी. **तथापि अद्यापही सदरचा अहवाल प्राप्त झालेला नाही.** | काढणेबाबतची कार्यवाही करणेबाबतचे सुचना दिलेल्या आहेत. तसेच सदर प्रकरणी तक्रारदार यांचे सोबत तक्रारीचे जागेवर जावुन महापालिका, वनविभाग व मीठ विभाग यांनी संयुक्त स्थळ पाहणी करुन ६ दिवसात अहवाल सादर करावा असे सुचना मा.अध्यक्ष यांनी दिनांक २३/०७/२०२१ रोजीचे बैठकीमध्ये दिले. | २. पोलिस उपआयुक्त (अभियान)पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई<br>३. नमक उपायुक्त, मुंबई |

वरीलप्रमाणे चर्चा होऊन बैठक संपन्न झाली.

(राजीव निवतकर)
जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा
अध्यक्ष, जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन उपसमिती